बुक-पोस्ट

श्री. / श्रीमती ______________________

______________________

______________________

______________________

अमर हिंद मंडळ
अमरवाडी,
गोखल पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

## द्वैवार्षिक अहवाल

**१ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च १९९९**

अमरवाडी
गोखल पथ (उत्तर)
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल १९९७ ते २६ ऑक्टोंबर १९९७

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | : | श्री. दिनकर शं. पाटील |
| | | श्री. जगन्नाथ शं. परब |
| | : | |
| अध्यक्ष | : | श्री. शंकरराव ना. साळवी |
| उपाध्यक्ष | : | श्री. एकनाथ ना. साटम |
| | | श्री. मधुकर ज. फडके |

## १ एप्रिल १९९७ ते ७ नोव्हेंबर १९९७

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. रमेश मा. वरळीकर |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| स. कार्यवाह | : | श्री. दीपक ना. पडते |
| कोषाध्यक्ष | : | श्री. सतीश श. रेडीज |
| सदस्य | : | श्री. अरुण अ. देशपांडे |
| | | श्री. विष्णु अ. कानविंदे |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| | | श्री. विनोद शं. हडप |
| | | श्री. चारुदत्त शां. धरवल |
| | | श्री. विष्णु दे. हरमले (स्वीकृत) |
| | | श्री. दत्ता अ. सावंत (स्वीकृत) |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर (स्वीकृत) |

## अमर हिंद मंडळ, दादर

### २६ ऑक्टोंबर १९९७ ते ३१ मार्च १९९९

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | : | श्री. दिनकर शं. पाटील |
| | | श्री. मुकुंद आ. तिवरेकर |
| | | श्री. एकनाथ ना. साटम |
| अध्यक्ष | : | श्री. शंकरराव ना. साळवी |
| उपाध्यक्ष | : | श्री. मधुकर ज. फडके |
| | | श्री. रमेश मा. वरळीकर |

### ७ नोव्हेंबर १९९७ ते ३१ मार्च १९९९

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरुण अ. देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| स. कार्यवाह | : | श्री. सतीश श. रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| सदस्य | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. विनोद शं. हडप |
| | | श्री. चारुदत्त शां. धरवल |
| | | श्री. किशोर आ. पालेकर |
| | | सौ. उषा शं. ~~महेता~~ मेहता |
| | | श्री. दत्ता अ. सावंत (स्वीकृत) |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर (स्वीकृत) |



# अमर हिंद मंडळ, दादर

**मुंबई - ४०० ०२८**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ९ जानेवारी २००० रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव ना. साळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही. विनंती.

**सभेपुढील कामे :-**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. व्दैवार्षिक अहवाल (सन १९९७-९८ व १९९८-९९ सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन १९९७-९८ व १९९८-९९ सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. १९९९-२००० चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६ इमारत निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

दि. १४-१२-९९

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**उमेश व्यं. शेणॉय**
कार्यवाह

**सूचना :**

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.
२. सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८ पर्यंत) शनिवार दिनांक १ जानेवारी २००० पर्यंत मिळेल.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरुपात शनिवार दिनांक १ जानेवारी २००० पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ पर्यंत (रविवार सोडून) आणून द्यावेत.
४. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी त्यांचे पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी / संबंधितानी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

# ❃ द्वैवार्षिक अहवाल ❃

## दिनांक १ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च १९९९

**सन्माननीय समासद बंधुभगिनींनों**

**सादर वन्दे,**

मंडळाच्या कार्याचा द्वैवार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत आपल्या बहुमोल सहकार्याने तसेच अनेक हितचिंतकांकडून मिळालेल्या हार्दिक सहयोग आणि आर्थिक पाठबळामुळे मंडळाचे अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक तसेच बहुविध सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या कार्यवाहीत आणले गेले. या सर्व कार्यक्रमांना चांगलाच प्रतिसाद आणि प्रसिध्दीही लाभली.

मंडळाच्या कार्यकारी समितीने वर्षारंभी खालील भविष्यकालीन योजना डोळ्यासमोर ठेवलेल्या होत्या.

- मंडळाच्या नवीन वास्तुची बांधकाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहाणे.
- विविध कार्यक्रमाव्दारे मंडळाच्या नावलौकिक वाढवणे.
- मंडळाची आर्थिक स्थिती मजबूत करणे.

आपणांस कळविण्यास आनंद होत आहे की बांधकाम योजनेचा आराखडा अंतिमतः मंजूर होऊन आलेला आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी स्वतः जातीने लक्ष घालून बहुमोल सहकार्य केले आहे. बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्याचे कार्यकारी समितीने ठरविले आहे.

अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून देखील मंडळाची आर्थिक स्थिती आजही समाधानकारक आहे हे आपणांस जमाखर्च / ताळेबंदपत्रकावरून विदीत होईल. मंडळाने वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची जी कार्यवाही केली त्यांना वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यव्दारे मिळालेल्या प्रसिध्दीमुळे मंडळाच्या नावलौकिकात निश्चित भर पडली आहे.

मंडळाच्या कार्याचा प्रत्येक वर्षाचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.



## दिनांक १ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च १९९८

**सभा** : वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण ९ सभा झाल्या, कार्यकारी समिती व विश्वस्त यांची एक संयुक्त सभा झाली (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पान ३४ पाहा.

**तहहयात सभासद** : या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**इमारत निधी** : अहवाल काळात रु. २,४०,०००/- (रुपये दोन लाख चाळीस हजार फक्त) इमारत निधीत वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था** : दिनांक १ जानेवारी ते ३० जून ९७ या दरम्यानच्या काळासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देवून निविदा (पूर्ण केटरिंग तसेच डेकोरेशन या दोन्ही बाबींसाठी) मागविण्यात आल्या. आलेल्या निविदांमधून हार्दिक केटरर्स आणि डेकोरेटर्स यांची निवड करण्यात येवून त्यांना फक्त भांडी व डेकोरेशनची ठेकेदारी देण्यात आली. १ जुलै ते ३० जून १९९८ पर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५० वी वसंत व्याख्यानमाला दिनांक २० एप्रिल ते ३० एप्रिल १९९७ या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय श्री. मनोहर जोशी यांच्या 'कालच्या, आजच्या व उद्याचा महाराष्ट्र' या विषयावरील व्याख्यानाने झाले. यानंतर विविध विषयावरील एकूण दहा व्यासंगपूर्ण व्याख्याने झाली. समारोप महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री माननीय श्री. सुधीर जोशी यांच्या व्याख्यानाने झाला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट २ पान ३५ पाहा) पहिल्या दिवसापासून व्याख्यानमालेला भरपूर श्रोतृवंद उपस्थित होता.

माननीय मुख्यमंत्र्यानी या वसंत व्याख्यानमालेत इमारत निधीसाठी मंडळाला यथायोग्य आर्थिक निधी देण्याचे घोषित केले. त्यानुसार मुख्यमंत्री निधीतून मंडळाला रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) चा धनादेशहि यानंतर त्यांच्याकडून सुपूर्त करण्यात आला.

### क्रीडा विभाग

**खो-खो** : जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेतील सर्व गटात प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही सहभाग होता. शिल्पा तोरणे, प्रीती धुरी, श्वेता कांबळी, शीतल चोप्रा, विशाखा सुर्वे, वैशाली

शेटये, सपना कर्पे, कविता धुरी, शुभदा धुरी, स्वाती गावडे, संकेत पेठे, प्रसाद कांबळी, अविनाश मोहिते, अभ्युदय मुंज, अमित काजारे, जतीन टाकले, अमेय मांजरेकर, गणेश बोरकर यांनी आपापल्या गटात चमकदार कामगिरी केली.

राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात मंडळाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.

खुला गट : शिल्पा तोरणे व श्वेता कांबळी, प्रीती धुरी (राखीव) (उरण (रायगड) स्पर्धा)

ज्युनियर गट : प्रीती धुरी, कविता धुरी (राखीव) अविनाश मोहिते (चाळीसगाव स्पर्धा)

सब ज्युनियर गट : शुभदा धुरी - (नाशिक स्पर्धा)

**राष्ट्रीय अजिंक्यपद मंडळाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.**

खुला गट : शिल्पा तोरणे - केरळ स्पर्धा व बंगलोरची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

ज्युनियर गट : प्रीती धुरी - अंतिम चाचणीसाठी निवड

सब ज्युनियर गट : शुभदा धुरी (राखीव) प्रवरानगर स्पर्धा

अहवाल काळात झालेल्या स्थानिक स्पर्धांतून मंडळाचे संघ सहभागी झाले होते. वरळी येथील पवन स्पोटर्स क्लबच्या संयोजनाखाली झालेल्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत तसेच मुं. शा. शि. मंडळाच्या मुलींच्या १६ वर्षा खालील गटाचे उपविजतेपद मंडळाच्या मुलींनी संपादन केले. पवनच्या स्पर्धेत 'प्रीती धुरीला' सर्वोत्कृष्ट आक्रमकाचे पारितोषिक मिळाले.

मुं. शा. शि. मं. च्या सब ज्युनियर गटाच्या स्पर्धेत मंडळाच्या मुलामुलींनी विरुध्द संघाला कडवी झुंज देत आकर्षक खेळ केला.

विद्यार्थी क्रीडा केंद्र ( ४ फुट ११ इंच) व सहकार सब ज्युनियर स्पर्धेत छोटया खेळाडूंनी नव्या आशा निर्माण केल्या.

मंडळातील दैनंदिन सरावाच्या लाभातून आपल्या खेळाडूंनी शैक्षणिक वर्षातील शालेय तसेच महाविद्यायीन स्पर्धा गाजवल्या.

महात्मा जोतिबा फुले कन्या शाळेच्या संघात मंडळाच्या खेळाडूंचा भरणा असतो. या संघाने दोन अजिंक्यपदे व एक उपविजतेपद शाळेला मिळवून दिले. सांगलीची



शालेय राज्य स्पर्धाही याच संघाने जिंकली. या अजिंक्य संघात मंडळाच्या प्रीती धुरी, श्वेता कांबळी, कविता धुरी, शुभदा धुरी, सपना कर्पे व मिनाक्षी शिंदे यांचा समावेश होता. प्रीती व कविता यांची भोपाळ येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेतील महाराष्ट्र संघात निवड झाली होती. प्रीती महाराष्ट्राच्या संघाची कर्णधार होती. या संघाने उपविजतेपद मिळविले. प्रीती व कविता या दोघींची इंडियन एज्युकेशन सोसायटीने सुवर्णपदक देऊन गुणगौरव केला तर इतर चौघींचे रौप्य पदक देऊन कौतुक केले.

सांगलीच्या 'ज्युनियर कॉलेज राज्य अजिंक्यपद स्पर्धेत' अजिंक्य ठरलेल्या मुंबई संघात रुपारेल कॉलेज तर्फे शीतल चोप्राची निवड झाली होती.

आंतर विद्यापीठ खो खो स्पर्धेत अभ्युदय मुंज (मुंबई विद्यापीठ ) वैशाली शेटये व जयश्री यादव (एस.एन.डी.टी विद्यापीठ) याची निवड झाली. वैशालीची ॲथलेटिक्ससाठीही निवड झाली. लागोपाठ दोन वर्षे दोन खेळासाठी वैशालीने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व केले. जयश्री यादव व विशाखा सुर्वे यांना आंतर महाविद्यालयीन (एस्. एन. डी. टी) खो-खो स्पर्धेत अनुक्रमे ज्युनियर व सिनियर गटात सर्वोत्कृष्ठ खेळाडूचे पारितोषिक मिळाले.

मंडळाचे कार्यकर्ते श्री. श्रीकृष्ण राणे व श्री. विजय राणे यांची अनुक्रमे मुंबई विद्यापीठ संघ व मुंबई शहर ज्युनियर संघ यांच्या निवड समितीवर नियुक्ती झाली.

दैनंदिन सरावाची जबाबदारी सर्वश्री रमेश वरळीकर, प्रफुल्ल पाटील, संजय पेडणेकर व रमेश नाटेकर यांनी सांभाळली. या प्रशिक्षकांच्या गैरहजेरीत जेष्ठ खेळाडू जबाबदारी सांभाळत होते.

**लेटिक्स** :- पुढील खोखोपटूंनी आपापल्या शैक्षणिक संस्थाच्या ॲथलेटिक्स स्पर्धातून प्रशंसनीय कामगिरी केली.

विशाखा सुर्वे : ११० मि. हर्डल, ४०० मि.

वैशाली शेटये : १०० मि. २०० मि. १०० x ४०० मि. रिले.

(एस.एन्.डी.टी. विदयापीठाचे आंतर महाविद्यालय स्पर्धेतील यश)

**स्वातंत्र्य दौड** : १५ ऑगस्ट १९९७ रोजी कांदीवली येथे झालेल्या स्वातंत्र्य दौड (मॅरेथॉन) स्पर्धेत मंडळाच्या १५ खेळाडूंनी भाग घेतला.

**कबड्डी**- पुरुष संघाने ११ स्थानिक स्पर्धांतून भाग घेतला. विविध वजनी गटांच्या स्पर्धांतून खेळताना मंडळाच्या खेळाडूंनी समाधानकारक प्रगती केली आहे. ११ पैकी ४ स्पर्धांच्या उपांत्य फेरीपर्यंत या संघाने धडक मारून चांगल्या आशा निर्माण केल्या आहेत. विशेषतः जिल्हा संघटनेच्या अजिक्यपद स्पर्धेत सहाव्या फेरी (उपांत्य फेरी) पर्यंत आपला संघ पोहोचला होता.

या सर्व स्पर्धांतून पुढील खेळाडूंची कामगिरी कौतुकास्पद होती. राहुल वंडेकर, योगेश पवार, सचिन बिर्जे, प्रितेश घुडेकर, भिंगारदेवे व कुणाल यादव.

मुलींच्या संघाला अहवाल काळात ९ स्पर्धांतून खेळायला संधी मिळाली. संघाने फार मोठी मजर मारलेली नसली तरी ५ स्पर्धांतून विजय अगदी अखेरच्या टप्प्यात असताना हातातून सटकला. नव्याने आकार घेणाऱ्या या संघाला अजूनही मोठ्या अनुभवाची गरज आहे.

अलका पारकर, रेश्मा चव्हाण, वैशाली काळे, संध्या तोडणकर, दर्शना राऊळ यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. देना बँकेतर्फे श्रमिक जिमखाना ना. म. जोशी मार्ग येथे झालेल्या स्पर्धेत अलका पारकरचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून गुणगौरव झाला व तिला ५०० रु. चे पारितोषिक मिळाले. मुंबई शहर संघाच्या ज्युनियर गटात अलकाची निवड झाली. ज्युनियर गटात निवड होणारी मंडळाची अलका ही पहिली खेळाडू आहे.

३० सप्टेंबर १९९७ रोजी गौतम नगर च्या झालेल्या ४५ किलो वजनी गटाच्या स्पर्धेत पहिला गुण उत्कृष्ठपणे टिपल्याबद्दचे पारितोषिक रेश्मा चव्हाण ला मिळाले.

दैनंदिन सरावाची जबाबदारी सर्वश्री विष्णु हरमले, विजय राणे व दिलीप भावे यांनी सांभाळली. त्यांच्या गैरहजेरीत जेष्ठ खेळाडू जबाबदारी सांभाळत होते.

## शालेय कबड्डी खोखो स्पर्धा

महिला वर्षाच्या निमित्ताने २३, २४, २५ फेब्रुवारी १९९८ या कालावधीत खास मुलींसाठी बृहनमुंबईतील आंतर शालेय कबड्डी व खो खो स्पर्धांचे आयोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले.

**कबड्डी** : एकूण १२ संघाचा सहभाग लाभला. दादरच्या महात्मा जोतिबा फुले कन्याशाळेने अंतिम सामन्यात डॉ. शिरोडकर हायस्कूल परळचा २९-२३ असा पराभव



करून अजिक्यपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन कबड्डीच्या राष्ट्रीय किर्तीच्या खेळाडूं कु. सुनिता जाधव व कु. शीला लुगडे यांच्या हस्ते झाले.

**खोखो** : एकुण ८ संघाचा सहभाग असलेल्या या स्पर्धेचे अजिक्यपद दादरच्या शारदाश्रम विद्यामंदिरने, दादरच्याच महात्मा जोतिबा फुले कन्याशाळेचा एक पाळी राखून गुणांनी पराभव करून संपादन केले.

स्पर्धेचे उद्घाटन खोखो राष्ट्रीय किर्तीची खो खो खेळाडूं सौ. झेलम इनामदार यांच्या हस्ते झाले.

स्पर्धांचा समारोप व दोन्ही खेळांचा पारितोषिक वितरण समारंभ सारस्वत बँकेच्या व्यवस्थापिका 'सौ. उर्वशी धराधर' यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी त्यांचे पती श्री. आनंद धराधर हेही उपस्थित होते.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूंची पारितोषिके मानकरी पुढीलप्रमाणे ठरले.

**कबड्डी** : सर्वोत्कृष्ठ पकडीचे - कविता कदम (डॉ. शिरोडकर हायस्कूल)
सर्वोत्कृष्ठ चढाईचे - गौरी पाटील (महात्मा जोतिबा फुले शाळा)
सर्वोत्कृष्ट अष्टपैलू - वैशाली काळे (महात्मा जोतिबा फुले शाळा)

**खोखो** - सर्वोत्कृष्ट आक्रमक- वृषाली टाकळे (शारदाश्रम विद्यामंदिर)
सर्वोत्कृष्ट संरक्षक - शुभदा धुरी (महात्मा जोतिबा फुले शाळा)
सर्वोत्कृष्ट अष्टपैलू - विद्या आमरे (शारदाश्रम विद्यामंदिर)

या सर्व गुणी खेळाडूंना चांगल्या प्रतीचे कॅलक्युलेटर बक्षिस म्हणून देण्यात आले. ही पारितोषिके मंडळाचे प्रमुख कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांनी वैयक्तिकरित्या दिली. या खेरीज कबड्डी, खोखोतील प्रत्येक सामन्यातील उभय संघाच्या अष्टपैलू खेळाडूंना खास बक्षिस म्हणून पंचरंगी बॉलपेनचा संच देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

या स्पर्धेप्रसंगी यंदाचा खोखोचा एकलव्य मानकरी श्री. प्रविण सिंदकर यांचाहि खास भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कबड्डी, खो खो स्पर्धेप्रसंगी प्रतिष्ठित व्यक्तींनी भेट देऊन खेळाडूंचे कौतुक केले. प्रत्येक सामना झाल्यानंतर खेळाडूंना विनामूल्य चहा व बिस्किटे देण्यात येत होती.

दिवसा उजेडी झालेल्या या स्पर्धेला क्रीडा प्रतिनिधींनी खूप प्रसिध्दी देऊन उत्तम सहकार्य केले. आकाशवाणीनेही त्यांच्या साप्ताहिक क्रीडावार्ता या कार्यक्रमांतून योग्य ती दखल घेतली. दादरच्या श्री. स्वामी समर्थ केमिस्टने उपयुक्त औषधे व वैद्यकीय साहित्य विनामूल्य पुरवून फार मोठा हातभार लावला.

दोन्ही खेळांच्या जिल्हा संघटनांनी व पंचमंडळींनी उत्तम सहकार्य केले. ही स्पर्धा डिसेंबर वा जानेवारीत झाली असती तर अधिक उत्तम प्रतिसाद मिळाला असता अशी प्रतिक्रिया जाणकारांनी व्यक्त केली.

**इतर :**

१. **फिटनेस मार्गदर्शन** - दिनांक सप्टेंबर १९९७ रोजी महाराष्ट्र राज्य खोखोच्या माजी संघनायिका व फिजीओथेरापिस्ट सौ. हेमलता देशमुख यांनी मंडळाच्या कबड्डी खोखो खेळाडूंनी फिटनेस कसा ठेवावा या बाबत प्रात्यक्षिकांसह छानदार मार्गदर्शन केले. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमास मंडळाचे प्रशिक्षकाही हजर होते.

२. **हेमोग्लोबिन व रक्तगट तपासणी** - दिनांक १७ ऑगस्ट १९९७ रोजी डॉ. अनिल वाकणकर यांनी मंडळाच्या कबड्डी खोखो खेळाडूंची मंडळाच्या वास्तूत रक्तपासणी करुन प्रत्येक खेळाडूचा अहवाल दुसऱ्या दिवशी सादर केला. डॉ. वाकणकरांनी ही सेवा विनामूल्य दिली.

सुमारे तीन तास चाललेल्या या रक्त तपासणी कार्यक्रमात २८ मुले व ३८ मुली सहभागी झाल्या. प्रत्येक खेळाडूंच्या अहवालाची मूळ प्रत संबधित खेळाडूंला देऊन, झेरॉक्स प्रत मंडळाच्या दप्तरी जतन केली आहे. रक्त चाचणीत ज्याच्यांत कमतरता आढळली, त्यांच्या पालकांना आवश्यक सूचना देऊन योग्य कारर्वाई करण्यास सांगितले अशा खेळाडूंची संख्या फक्त ४ (१ मुलगा व ३ मुली) होती. या कार्यक्रमास दै. महाराष्ट्र टाइम्सने दिनांक २० ऑगस्ट १९९७ रोजी खास चौकटीत प्रसिध्दी दिल्यामुळे कार्यक्रमाची उपयुक्तता व महत्त्व अनेकांना पटण्यास सहज मदत झाली.

३. **वार्षिक सहल** :- २ व ३ ऑगस्ट १९९७ रोजी मुरुड-जंजीरा येथे खेळाडू व कार्यकर्ते यांची सहल आयोजित केली होती. खास बर्सची व्यवस्था केलेल्या या सहलीत ५० व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. खेळीमेळीच्या वातावरणात सहल झकास पार पडली. वैयक्तीक वर्गणी व मंडळाने मंजूर केलेल्या रक्कमेतून सहलीचा संपूर्ण खर्च भागविण्यात आला. 'दिघे लॉजिंग हाऊस' मध्ये सर्वांची विनामूल्य राहण्याची व्यवस्था झाली.



४. **अभिनंदनीय** :- मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकरराव साळवी यांचे भारतीय कबड्डी फेडरेशनच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली.

मंडळाचे उपाध्यक्ष श्री. एकनाथ साटम यांची मुंबई खोखो संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली. तसेच संघटनेच्या कार्यकारिणीवर मंडळाचे प्रतिनिधी म्हणून श्री. विजय राणे यांची निवड झाली.

**कला विभाग :**

सर्वश्री चिंतामणी नागले, विनोद हडप, दत्ता सावंत इ. च्या मार्गदर्शनाखाली मंडळाने अनेक उपक्रम आयोजित केले.

**बालनाटय प्रशिक्षण शिबिर** - २१ एप्रिल ते ३० एप्रिल ९७ या कालावधीत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे हे शिबिर मंडळातर्फे आयोजिले. बालनाटय शिबिरास एकुण ५० बालकलाकारांचा सहभाग होता. या शिबिरात सर्वश्री विनोद हडप, दत्ता सावंत, सुहास कामत, कु. अश्विनी मोरे, सीमा घोगळे यांचे मार्गदर्शन लाभले. बालकलाकारांना प्रोत्साहन देण्याकरिता मंडळाने दि. १ मे ९७ रोजी शिबिरार्थीच्या नाटिका प्रथम मंडळाच्या सभागृहात व त्यानंतर दामोदर हॉल येथे सादर केल्या.

दिनांक २४ नोव्हेंबर १९९७ रोजी 'आकृती रंग' संकल्पित 'मनाचे श्लोक आणि मनाचे रोग' हा अभ्यासपूर्ण उद्‌बोधक कार्यक्रम मंडळाच्यावतीने मंडळाच्या सभागृहात सादर केला. सुप्रसिध्द तज्ज्ञ आणि समोपचारक अजय ताम्हणे व अरुण नाईक यांचा सहभाग होता. तसेच सुसंवादक सुहास कामत हे होते.

**इतर कार्यक्रम :**

- अखिल भारतीय किर्तन संस्था यांचे स्वातंत्र्यांच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त जे विविध कार्यक्रम आयोजित केले. त्यामध्ये मंडळाचा सक्रीय सहभाग होता तसेच त्यांना मंडळाचे सभागृहही कार्यक्रमासाठी विनामूल्य देण्यात आले होते
- दिनांक २० जुलै १९९७ रोजी 'अमर हिंद मंडळ' आणि 'फलश्रुती शिक्षण मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमेनिमित्त फलश्रुतीच्या उपक्रमातील गुणवत्ता

यादीत झळकलेल्या व अन्य गुणवान विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ 'गुरुवंदना समारंभ' हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

- या कार्यक्रमात मा. डॉ. वि. गो. कुलकर्णी (माजी संचालक, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद) आणि मा. श्री. गो. म. दाभोळकर (मुख्याध्यापक, बालमोहन विद्यामंदिर, दादर) यांचाही सत्कार करण्यात आला.

- स्वातंत्र्य सेनानी कै. सुभाषचंद्र बोस यांच्या जन्मशताब्दी निमित्त १९ जानेवारी ते २५ जानेवारी १९९८ या दरम्यान 'विवेक व्यासपीठ' 'आस्वाद मंच' यांच्या सहकार्याने राष्ट्रीय किर्तनकार प्रा. डॉ. दिलीप डबीर (नागपूर) यांच्या 'सुभाषचंद्र बोसांचे बालपण' ते 'हिमालयाची साहस यांत्रे' पर्यंत सुभाष बाबूंच्या जीवनातील अव्दीतीय कामगिरीचा सुंदर आढावा घेणारा सुभाष-गौरव-गाथा हा कार्यक्रम किर्तन माध्यमातून सादर केला.

- या कार्यक्रमास डॉ. अशोक दा. रानडे, श्री. वि. श्री. जोशी (जेष्ठ लेखक) श्री. अरविंद गोडबोले (अध्यक्ष-सावरकर स्मारक) निवृत्त मेजर ए. पी. ओक, श्री. पु. ना. ओक (जेष्ठ इतिहास संशोधक) श्री. चंद्रशेखर वाघ (संपादक, सांज लोकसत्ता) श्री. दामुअण्णा दाते. यासारखे महनीय पाहुणे प्रतिदिनी उपस्थित होते.

- भारताचा प्रजासत्ताकदिन सोमवार दि. २६ जानेवारी १९९८ रोजी सकाळी मंडळाच्या पटागंणात प्रखर राष्ट्रवादी, ४२ च्या स्वातंत्र लढयातील भूमिगत कार्यकर्त्या, संयुक्त महाराष्ट्रांच्या चळवळीतील अग्रणी आणि मराठी रंगभूमीवरील ऐकेकाळच्या जेष्ठ अभिनेत्री 'श्रीमती कुसुमताई कुळकर्णी' यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करून साजरा करण्यात आला.

- सायंकाळी मंडळाच्या ५१ व्या वर्धापनानिमित्त मंडळाचे सभासद, कार्यकर्ते, हितचिंतक आश्रयदाते, आजीमाजी खेळाडू आणि कलावंत यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या प्रसंगी श्री. दिलीप प्रभावळकर यांच्या प्रेक्षणीय सहा भूमिका असलेला बहुरंगी-बहुंढगी निर्भेळ करमणूकीचा कार्यक्रम 'हसवाफसवी' सादर करण्यात आला. या कार्यक्रमास प्रेक्षकांनी एकच गर्दी केली होती.



- दिनांक २६ ऑक्टोंबर १९९७ रोजी मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव साळवी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सभा झाली या अगोदर मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक निवडणूक अधिकारी श्री. अनिल वाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आली. या निवडणूकीत खालील सभासदांची निवड झाली तर तीन विश्वस्त एक अध्यक्ष आणि दोन उपाध्यक्ष हे बिन-विरोध निवडून आले.

| पद | नांव | निकाल |
|---|---|---|
| विश्वस्त | १) श्री. तिवरेकर मुकुंद आत्माराम | बिन विरोध निवड |
| | २) श्री. पाटील दिनकर शंकर | |
| | ३) श्री. साटम एकनाथ नारायण | |
| अध्यक्ष | १) श्री. साळवी शंकरराव नारायण | |
| उपाध्यक्ष | १) श्री. फडके मधूकर जर्नादन | |
| | २) श्री. वरळीकर रमेश माधवराव | |

**कार्यकारी समितीचे सभासद**

| | |
|---|---|
| श्री. शेणॉय उमेश व्यंकटराव | श्री. देशपांडे अरुण अनंत |
| श्री. रेडीज सतीश शरच्चंद्र | श्री. राणे श्रीकृष्ण शंकर |
| श्री. हडप विनोद शंकर | श्री. नागले चिंतामणी विश्वनाथ |
| श्री. थरवल चारुदत्त शांताराम | श्री. केरकर भास्कर भिवा |
| श्री. पडते दीपक नारायण | सौ. मेहता उषा शशिकांत |
| श्री. पालेकर किशोर आत्माराम | |

यानंतर निर्वाचित सभासंदामधून दि. ७-११-९७ रोजी झालेल्या जून्या नव्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये खालील नवीन कार्यकारी समिति निवडण्यात आली.

| | |
|---|---|
| कार्याध्यक्ष : | श्री. नागले चिंतामणी विश्वनाथ |
| कार्योपाध्यक्ष : | श्री. देशपांडे अरुण अनंत |
| कार्यवाह : | श्री. शेणॉय उमेश व्यंकटराव |
| स. कार्यवाह : | श्री. रेडीज सतीश शरच्चंद्र |
| कोषाध्यक्ष : | श्री. राणे श्रीकृष्ण शंकर |

- श्री. दत्ता सावंत, श्री. संजय पेडणेकर यांना दि. १-१-९८ रोजी कार्यकारी समितीकडून स्वीकृत सभासद म्हणून निवडण्यात आले.

- मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या लग्न, समारंभ व इतर कार्यक्रमासाठी दि १४-०६-९७ पासून नवीन दर निश्चित करण्यात आले.

- कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांच्या संयुक्त सभेत ठरल्याप्रमाणे भंगार विक्री करण्यात आली. याव्दारे मिळालेले रु. १७००/- (रुपये एक हजार सातशे फक्त) किरकोळ जमेमध्ये वर्ग करण्यात आले.

- मंडळाच्या खेळाडूंच्या लग्नप्रसंगी मंडळाच्या वतीने आहेर दाखल रु. १०१/- देण्याचा दि. -१-१-९८ च्या कार्यकारी समितीमध्ये निर्णय घेण्यात आला.

- 'अमर हिंद मंडळ' व 'अक्षरा' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आतंरराष्ट्रीय महिला दिना निमित्त दि. ७ मार्च १९९८ रोजी मंडळाच्या जागेत एक अभिनव असा युवती मेळा आयोजित करण्यात आला.

१५ ते २५ या वयोगटातील युवतींच्या या मेळाव्यात युवतींसाठी विविध स्पर्धांही घेतल्या गेल्या. 'जीवनाला सामोरे जाऊ', 'स्वप्नाबरोबर भरारी घेऊ' हा या मेळाव्याचे घोषवाक्य होते. विविध चित्रफलकांनी सजलेल्या वातावरण समाजाच्या सर्व थरांतील युवतींचा उत्तम प्रतिसाद लाभला. यावेळी "मैदानातील महिला" हा मंडळाचा चित्रफलक खास आकर्षण ठरला.

### श्रध्दाजंली

इंडियन एज्यु. सोसायटीचे विश्वस्त आणि मंडळाचे हितचिंतक मा. माणिकराव लोटलीकर तसेच मंडळाचे विश्वस्त श्री. दिनकर पाटील यांच्या पत्नी आणि मंडळाच्या तहह्यात सभासद श्रीमती सुनंदा दिनकर पाटील यांचे अहवालकाळात निधन झाले. मंडळाच्या वतीने त्यांना साश्रुपूर्ण श्रध्दांजली.



## दिनांक १ एप्रिल १९९८ ते ३१ मार्च १९९९

**सभा** :- वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण ६ सभा आणि कार्यकारी समिती व विश्वस्त यांची दोन संयुक्त सभा (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ठ १ पान ३१ पाहा) झाली.

**तहहयात समासद** : या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**इमारत निधी** : अहवाल काळात रु. ४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार फक्त) इमारत निधी मध्ये वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था** : हार्दिक केटरर्स अॅन्ड डेकोरटर्स यांच्या पूर्वीच्या कामाचे मूल्यमापन त्यांना करून दि. १ जुलै ते ३१ डिसेंबर १९९८ पर्यंत ठेकेदारीसाठी मुदतवाढ देण्यात आली. त्यांच्या विनंतीनुसार ही मुदत वाढ नंतर त्यांना ३१ मार्च १९९९ पर्यंत वाढविण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला** :- मंडळाची ५१ वी वसंत व्याख्यानमाला दि. २० एप्रिल ते २८ एप्रिल १९९८ या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन जेष्ठ साहित्यिक श्री. य. दि. फडके यांच्या 'लोकसभा निवडणुकी नंतरचा भारत' या विषयावरील व्याख्यानाने झाले. यानंतर विविध विषयावरील एकूण आठ व्यासंगपूर्ण व्याख्याने झाली. समारोप माजी न्यायमूर्ती श्री. पी. बी. सावंत यांच्या व्याख्यानाने झाला (अधिक माहितीसाठी परिशिष्ट ३ पान ३६ पाहा) पहिल्या दिवसापासूनच व्याख्यानमालेला भरपूर श्रोतृवृंद उपस्थित होता.

## क्रीडा विभाग

प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही मंडळाचे खोखो व कबड्डी संघ वेगवेगळ्या स्तरांच्या गटांच्या स्पर्धांतून खेळले. काही ठिकाणी खेळांडूनी अंतिम फेरी तर काही ठिकाणी उपात्यफेरी पर्यंत मजल मारली. खोखो व कबड्डीच्या प्रत्येकी दोन स्पर्धांची अजिवयपदे थोडक्यात हुकली.

**वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी पुढील प्रमाणे आहे.**

## (अ) सांघिक

<u>खोखो</u> - मुंबई शहर जिल्हा अजिक्यपद स्पर्धेतील सब ज्युनियर गट तसेच मुं. शा. शि. मं. च्या वयोगट स्पर्धेतील सब जुनि. गटांचे, मडळांच्या मुलांनी उपविजतेपद मिळविले. १६ वर्षे गटातील (ज्युनियर) मुलींनी मुं.शा.शि.मं. स्पर्धेत तसेच वांद्रे येथील नवयुवक संघाची जोड जिल्हा स्पर्धा आणि कुळगावच्या राज्य स्तरीय स्पर्धेत उपविजेते पद मिळविले.

मंडळाच्या महिला संघाने परळच्या 'विद्यार्थी क्रीडा केंद्र' व नायगावच्या 'श्री साई केंद्र' यांचा जोड जिल्हा स्पर्धेत अनुक्रमे उपविजेते पद व ३रा क्रमांक संपादन केला. औरंगाबाद महापौर राज्य स्तरीय स्पर्धेत महिला संघाला ४ था क्रमां मिळाला. मुंबई शहर महिला क्रीडा खोखो स्पर्धेचे उपविजेते पद मंडळाने मिळविले.

**<u>कबड्डी</u> - प्रभादेवी येथील 'विचार जागृती मंडळातर्फे' झालेल्या जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत ४५ किलो वजनी मुलींच्या गटाचे तसेच पुरुष गटाचे अजिक्यपद मंडळाच्या खेळांडूनी निर्विवादपणे पटकावले. एकाच स्पर्धेत दोन्ही अजिंक्यपदे व चार वैयक्तिक पारितोषिके ही घटना मंडळाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरली आहे.**

मुं. शा.शि.मं. आयोजित जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत खुलागट पुरुष व विभाग तसेच माहिम येथील 'सावळ्या तांडेल विद्यार्थी समिती' यांच्या स्थानिक स्पर्धेत महिला गटाचे उपविजेते पद मंडळाला मिळाले.

मुलांच्या ५५ किलो वजनी गटाच्या ५ स्पर्धांतून मंडळाचा संघ उपांत्य उपविजयी ठरला. वसई येथील 'वाल्मीकी क्रीडा मंडळाच्या' आमंत्रितांच्या स्पर्धेत मंडळाचा महिला संघ अजिक्य ठरला. माहिमच्या 'युवक क्रीडा मंडळाच्या' महिला गटात संघ उपांत्य उपविजयी ठरला.

## (ब) वैयक्तिक

<u>खो खो</u>

<u>प्रीती धुरी</u> - पाटणा ज्युनियर मुली राष्ट्रीय अजिक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राची कर्णधार, राष्ट्रीय अजिंक्यपद खोखो स्पर्धा (जबलपूर) साठी महाराष्ट्र संघात निवड बीड येथील महाराष्ट्र राज्य अजिक्यंपद खोखो स्पर्धेसाठी मुंबई संघात निवड.



औरंगाबाद महापौर व विद्यार्थी क्रीडा केंद्र खोखो स्पर्धेत दिवसाची मानकरी म्हणून गुणगौरव. फेडरेशन चषक (दिल्ली ) आणि मणिपूरच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महाराष्ट्र संघात तिची निवड झाली होती. पण परिक्षेच्या कारणास्तव ती सहभागी होऊ शकली नाही.

<u>श्वेता कांबळी</u> - बीड राज्य स्पर्धेतील मुंबई संघात निवड, राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धा (जबलपूर) महाराष्ट्र संघातून निवड. 'विद्यार्थी क्रीडा केंद्र' स्पर्धा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू, तर श्री साई क्रीडा केंद्र स्पर्धेत स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक म्हणून गुणगौरव.

<u>विशाखा सुर्वे</u> - राष्ट्रीय महिला क्रीडा महोत्सव स्पर्धेत महाराष्ट्र खोखो संघाचे प्रतिनिधित्व.

<u>कविता धुरी</u> - अहमदनगर राज्य ज्युनियर खोखो स्पर्धेत मुंबई संघात निवड. त्याच स्पर्धेत सर्वोत्कृष्ट आक्रमकचे पारितोषिक. औरंगाबाद राष्ट्रीय ज्यु. अजिक्यपद खोखो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड, महाराष्ट्र शालेय संघातून निवड पण स्पर्धा झाली नाही. कुळगाव ज्यु. राज्य स्तरीय खोखो स्पर्धेतील दिवसाची मानकरी म्हणून गुणगौरव

<u>शुभदा धुरी</u> - मुं. शा. शि. मं. आयोजित १६ वर्षे वयोगटात सर्वोत्कृष्ट संरक्षकाचे पारितोषिक. मुंबई ज्युनियर संघात १३वी खेळाडू, महाराष्ट्र शालेय संघात निवड पण स्पर्धा झाली नाही.

<u>सपना कर्पे</u> - मुंबई ज्युनियर संघात निवड, कुळगाव राज्य स्तरीय खोखो स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू म्हणून गुणगौरव.

<u>शीतल चोप्रा</u> - मुंबई विद्यापीठ खोखो संघात निवड, औरंगाबाद महापौर चषक खोखो स्पर्धेत दिवसाची मानकरी म्हणून गुणगौरव.

<u>वैशाली शेटये</u> - आंतर विद्यापीठीय खोखो तसेच ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी एस. एन.डी.टी. विद्यापीठ खोखो संघात निवड.

<u>अस्मिता मुतालीक</u> : नवयुवक क्रीडा मंडळ (वांद्रे) यांच्या जोड जिल्हा खोखो स्पर्धेत सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा बहुमान.

<u>जतीन टाकळे</u> - मुंबई विद्यापीठीय खोखो संघात निवड.

**<u>लिलेश गावडे</u>** - मुंबई शहर जिल्हा (ज्युनियर) खोखो संघात निवड.

**<u>निलेश सावंत</u>** - मुंबई शहर सब ज्युनियर खोखो गटाच्या अजिंक्यपद खोखो स्पर्धेतील 'सर्वोत्कृष्ट संरक्षक' म्हणून गुणगौरव. मुंबई संघात निवड.

**<u>प्रसाद कांबळी</u>** - मुंबई शहर सब ज्यु. खोखो संघात निवड, मुं. शा.शि.मं. आयोजित जिल्हा स्तरीय सब ज्यु. गटाच्या खोखो स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संरक्षक.

**<u>गणेश बोरकर</u>** - मुंबई शहर सब ज्यु. खोखो संघात निवड.

**<u>कबड्डी</u>** -

**<u>कुणाल यादव</u>** - 'ओम ज्ञानदीप मंडळ' (वरळी) व 'ओम साई क्रीडा मंडळ' (लोअर परळ) यांच्या ५५ किलो वजनी गटातील आणि प्रभादेवी येथील 'विचार जागृती' मंडळाच्या पुरुष गटातील 'सर्वोत्कृष्ट अष्टपैलू' म्हणून गुणगौरव.

**<u>राकेश मेस्त</u>** - प्रभादेवीच्या वरील स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक

मुं. शा. शि. मं. च्या पुरुष 'बट' गटाचे उपविजतेपद मिळाल्याबद्दल प्रत्येक खेळाडूचा आकर्षक बक्षिस देऊन संयोजकांनी कौतूक केले.

**<u>वैशाली काळे</u>** - आंबेवाडी महिला खुलागट कबड्डी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट चढाईचे पारितोषिक 'युवक क्रिडा मंडळ' (माहिम) स्पर्धेत दिवसाची मानकरी म्हणून गुणगौरव. प्रभादेवीच्या 'विचार जागृती मंडळ 'स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अष्टपैलू.

**<u>अलका पारकर</u>** - प्रभादेवीच्या वरील स्पर्धेतच 'सर्वोत्कृष्ट पकडीचे' पारितोषिक 'सावळ्या तांडेल विद्यार्थी समिती (माहिम)' स्पर्धेत सर्वोत्कृष्ट वढाई बद्दल बहुमान

**<u>संध्या तोडणकर</u>** - 'दामोदर सेवा मंडळ' आयोजित स्पर्धेतील 'सर्वोत्कृष्ट खेळाडूंचे म्हणून गुणगौरव.

## (क) इतर

**१) क्रीडा शिष्यवृत्ती - प्रीती धुरी, श्वेता कांबळी, सपना कर्पे, कविता धुरी, शुभदा धुरी यांना खोखोतील गुणवत्तेबद्दल विविध क्रीडाशिष्यवृत्ती मिळाल्या. एकाच हंगामात एकदम पाच खेळाडूंना शिष्यवृत्ती लाभल्याचा पराक्रम मंडळाच्या क्रीडा इतिहासात प्रथमच घडला.**



**२) पंच परीक्षा** - जिल्हा स्तरीय खोखो पंच परीक्षेत 'कु. अपर्णा वैद्य' सर्व प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

श्री. योगेश पवार व श्री. प्रीतेश गुडेकर हे जिल्हा स्तरीय कबड्डी पंच परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

**३) मुंबई खोखो निवड समितीवर नियुक्ती** - श्री रमेश नाटेकर ज्युनियर संघासाठी तर श्री. योगेंद्र माने सब ज्युनियर संघासाठी.

४) डॉ. धनगौरी शेणवी यांनी के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये मंडळाच्या महिला कबड्डी व खोखो (एकूण २५) खेळांडूची वैद्यकीय तपासणी करुन अहवाल सादर केला. त्यांच्या सूचनांची दखल घेतली गेली आहे.

५) कबड्डी प्रशिक्षक श्री. दिलीप भावे हे राष्ट्रीय कीर्तीचे मान्यताप्राप्त शरीरसौष्ठवाचे पंच आहेत, अहवाल काळात अनेक स्पर्धांतून त्यांनी सहभाग दिला.

६) स्थानिक ॲथलेटिक्स स्पर्धांतून मंडळाच्या खेळांडूनी भाग घेतला पण यंदा एकाही खेळांडूनी पहिल्या तीन क्रमांकात स्थान मिळविले नाही याचा खेद वाटतो.

७) न्यु. साऊथ वेल्स विद्यापीठाच्या शैक्षणिक क्षमता केंद्रातर्फे भारतात घेतल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय पातळीच्या शालेय विज्ञान कसोटीच्या चाचणी स्पर्धेत सब ज्युनियर गटातील खोखोपटू कु. अनिस कंगणी याने स्वतच्या शाळेमार्फत भाग घेऊन इयत्ता ५ वी च्या गटात 'प्रथम वर्ग उच्च श्रेणी' संपादन केली

८) मंडळाच्या मैदानात तयार झालेल्या खेळांडूनी आपआपल्या शाळा कॉलेज तर्फे खेळून संबंधित स्पर्धांतून उत्तम कामगिरी नोंदवली.

९) **<u>दैनदिन सराव</u>** - खोखो (पुरुष, मुले) श्री रमेश नाटेकर, खोखो (महिला, मुली) श्री. प्रफुल्ल (बाळा) पाटील, कबड्डी (पुरुष-मुले) श्री. दिलीप भावे. कबड्डी (महिला मुली) श्री. विजय राणे, हे सराव घेत असतात. त्यांना सहाय्यक म्हणून संबंधित जेष्ठ खेळाडू सहकार्य करत असतात. आवश्यक तेव्हा श्री. रमेश वरळीकर खोखोसाठी मार्गदर्शन करतात.

१०) रोज सुमारे ८० खेळाडू मैदानात सराव करत असतात. खाजगी शिकवणी वर्ग शाळा कॉलेज यांचा वेळ आणि सरावाची वेळ यांचा ताळमेळ जुळविणे दिवसेंदिवस अवघड होत आहे. तरी सुध्दा प्रशिक्षक व खेळाडू श्रम घेत आहेत.

११) काही खेळांडूनी खेळाबरोबरच अभ्यासातही उत्तम गुणवत्ता सिध्द केली आहे खेळ व अभ्यास यांच्या उत्तम समतोल संभाळणाऱ्या खेळांडूचा गुणगौरव करण्याचा विचार आहे.

**इतर कार्यक्रम**

◆ व्यापारातील भ्रष्टाचारावर 'ग्राहक जागृती' हाच ऐकमेव पर्याय या करिता 'अमर हिंद मंडळ' आणि 'लायन्स क्लब्ज इंटरनॅशनल' यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राहक मार्गदर्शन शिबीर' बुधवार दि. २३ डिसेंबर १९९८ रोजी मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले.

◆ भारताच्या प्रजासत्ताकदिन सोमवार दि. २६ जानेवारी १९९९ रोजी सकाळी मंडळाच्या पटांगणात जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक कॉ. तारा रेड्डी यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करुन साजरा करण्यात आला.

◆ सायंकाळी मंडळाच्या ५१ व्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाचे सभासद, कार्यकर्ते हितचिंतक, आश्रयदाते, आजीमाजी खेळाडू आणि कलावंत यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या प्रसंगी रसिकांचे मनोरंजन करणारा मुलाखतीचा एक निर्मेळ करमणुकीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. 'रसिकांच्या दरबारात राशीचक्रकार.' राशीचक्र चे अगणित प्रयोग करणारे मा. श्री. शरद उपाध्ये यांची रंगतदार-खुमासदार मुलाखत मुलाखतकार श्री. अशोक शेवडे यांनी या प्रसंगी सादर केली. या मुलाखतीच्या कार्यक्रमास प्रेक्षकांनी एकत गर्दी केली होती.

## श्रध्दांजली

मंडळाचे तहहयात सभासद आणि मंडळाचे स. कार्यवाह श्री. सतीश रेडीज यांचे कनिष्ठ बंधू श्री. अनिल रेडीज तसेच मंडळाचे तहहयात सभासद आणि कार्यकारी समितीचे माजी सदस्य श्री. विष्णु अ. कानविंदे यांचे अहवालकाळात निधन झाले. मंडळाची त्यांना साश्रुपूर्ण श्रध्दांजली.



# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई - २८

## ३१ मार्च १९९८ आणि ३१ मार्च १९९९ अखेरच्या

## मुदत-ठेवींची विगतवारी

| | परिशिष्ट अ<br>रुपये पैसे | परिशिष्ट ब<br>रुपये पैसे |
|---|---|---|
| अभ्युदय को. ऑप. बँक लि. | १,६३,३२४.७५ | १,८९,३८३.४५ |
| सारस्वत को. ऑप. बँक लि. | ५०,०००.०० | १,१२,४२१.२२ |
| दि. कॉसमॉस को. ऑप. बँक | ८२,७९०.०० | ५८,३४९.०० |
| दि. नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. बँक लि. | ४६,४१८.०० | १,११,९४१.०० |
| बँक ऑफ इंडिया | २,५१,७५४.०० | १,९०,७२९.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २,०२,२६५.०० | २,३३,८१८.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | १,७५,८३५.०० | २,४६,१०८.०० |
| इंडियन बँक | — | १,००,१२३.०० |
| युनायटेड वेस्टर्न बँक | ८१,४४८.०० | ८८,२७०.०० |
| युनियन बँक ऑफ इंडिया | ९,०१,५२६.०० | ११,५१,९९२.०० |
| अपना सहकारी बँक लि. | ५०,०००.०० | ५७,००८.०० |
| युको बँक | १,००,०००.०० | १,११,१११.०० |
| एकूण | २१,०५,३६०.७५ | २६,५१,२५३.६७ |

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
### (परिशिष्ट १)

| | १९९७-९८ | १९९८-९९ |
|---|---|---|
| १) श्री. शंकरराव ना. साळवी (अध्यक्ष) | ६ | १ |
| २) श्री. एकनाथ ना. साटम (उपाध्यक्ष) (२६-१०-९७ पर्यंत) | ३ | — |
| ३) श्री. मधुकर ज. फडके (उपाध्यक्ष) | २ | १ |
| ४) श्री. रमेश मा. वरळीकर (उपाध्यक्ष) (कार्योपाध्यक्ष २६-१०-९७ पर्यंत, उपाध्यक्ष २६-१०-९७ पासून) | ९ | २ |
| ५) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ९ | ६ |
| ६) श्री. अरुण अ. देशपांडे (कार्योध्यक्ष) (सदस्य ७.११.९७ पर्यंत, कार्योपाध्यक्ष ७.११.९७पासून) | ९ | ६ |
| ७) श्री. उमेश व्यं शेणॉय (कार्यवाह) | ९ | ६ |
| ८) श्री. सतीश श. रेडीज (सं. कार्यवाह) (कोषाध्यक्ष ७-११-९७ पर्यंत, सं. कार्यवाह ७-११-९७ पासून) | ९ | ५ |
| ९) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) (सदस्य ७-११-९७ पर्यंत, कोषाध्यक्ष, ७-११-९७ पासून) | ८ | ४ |
| १०) श्री. विष्णु अ. कानविंदे (सदस्य) (७-११-९७ पर्यंत) | ४ | — |
| ११) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) (स. कार्यवाह ७-११-९७ पर्यंत, सदस्य ७-११-९७ पासून) | १ | — |
| १२) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ८ | ५ |
| १३) श्री. विनोद शं. हडप (सदस्य) | ६ | ३ |
| १४) श्री. चारुदत्त शां. थरवल (सदस्य) | ४ | ४ |
| १५) श्री. किशोर आ. पालेकर (सदस्य) (७-११-९७) पासून | २ | २ |
| १६) सौ. उषा श. मेहता (सदस्य) (७-११-९७ पासून) | १ | १ |
| १७) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ६ | ४ |
| १८) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | १ | ४ |



परिशिष्ट (२)

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५० वे)

## कार्यक्रम पत्रिका

रविवार : व्याख्यानमालेचे उद्घाटन
दि. २०-४-९७ **उद्घाटक - मा. ना. मनोहर जोशी**
(मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
**विषय** : *कालचा, आजचा आणि उद्याचा महाराष्ट्र*

सोमवार : **डॉ. विश्वास मेहेंदळे**
दि. २१-४-९७ **विषय** : *देह बोली ते उपग्रह बोली*

मंगळवार : **डॉ. हेमू अधिकारी**
दि. २२-४-९७ **विषय** - *वैज्ञानिक प्रगती व सामाजिक स्थित्यंतरे*

बुधवार : **प्रभाकर पणशीकर, चित्तरंजन कोल्हटकर**
दि. २३-४-९७ **विषय** : *नाटक - जनात व मनात*
प्रश्नकर्त्या - मंगला खाडीलकर

गुरुवार : **श्री. अशोक जैन**
दि. २४-४-९७ **विषय** - *जंतर - मंतर :- राजकीय व साहित्यिक*
प्रश्नकर्त्या - मंगला आठलेकर

शुक्रवार : प्रा. शिवाजी सावंत (मृत्यूंजयकार)
दि. २५-४-९७ **विषय** - *धुरंधुर श्रीकृष्ण*

शनिवार : **डॉ. बापूसाहेब रेगे, डॉ. व झा. साळी, प्रा. कल्पना सुळे**
दि. २६-४-९७ **विषय** - *सार्वत्रिक परीक्षा :- सामाजिक व्यथा*
मुलाखतकार - श्री. मधूकर ज. फडके

रविवार : प्रा. मधू दंडवते (उपाध्यक्ष-नियोजन मंडळ)
दि. २७-४-९७ **विषय** - *न्यायपालिका, संसद आणि कार्यपालिका*

सोमवार : **डॉ. गिरीश बापट**
दि. २८-४-९७ **विषय** - *शिक्षणाचा भविष्यवेध*

मंगळवार : **डॉ. निर्मलकुमार फडकुले**
दि. २९-४-९७ **विषय** - *सावरकरांच्या साहित्यातील सामर्थ्यस्थाने*

बुधवार : मा. श्री. सुधीर जोशी (शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य)
दि. ३०-४-९७ **विषय** - *शिक्षण क्षेत्रातील काही निर्णयाबद्दल खुलासा*

परिशिष्ट (३)

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५१ वे)

## कार्यक्रम पत्रिका

सोमवार : व्याख्यानमालेचे उद्घाटन
दि. २०-४-९८ **उद्घाटक - जेष्ठ साहित्यिक श्री. य. दि. फडके**
विषय - लोकसभा निवडणुकी नंतरचा भारत

मंगळवार : **श्री. सदानंद मोरे**
दि. २१-४-९८ विषय : *तुकाराम दर्शन*

बुधवार : **श्री. नानासाहेब पाटील** (सचीव : मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
दि. २२-४-९८ विषय - *ग्रामीण विकासाची नवीन क्षितीजे*

गुरुवार : **डॉ. अनिल अवचट**
दि. २३-४-९८ विषय : *मुलांना वाढविण्यासंबंधीच्या माझ्या कल्पना*

शुक्रवार : **श्री. अरुण गुजराती** (आमदार)
दि. २४-४-९८ विषय - *विधानसभेतील कामकाज*

शनिवार : **सर्वश्री मोहन जोशी, विवेक लागू, कमलाकर नाडकर्णी,**
दि. २५-४-९८ **विनोद हडप आणि सौ. सविता प्रभूणे**
नाटयावलोकन - "माझं छान चाललया ना!"

रविवार : **प्रा. मधू दंडवते** (माजी केंद्रीय मंत्री)
दि. २६-४-९८ विषय - *निवडणूक पध्दतीतील सुधारणा*

सोमवार : **श्री. साबीर शेख** (कामगार मंत्री)
दि. २७-४-९८ विषय - *शब्द हेचि धन*

मंगळवार : **माजी न्यायमूर्ती श्री. पी. बी.सावंत**
दि. २८-४-९८ विषय - *लोकशाहीतील आंतर-विरोध*

●●●